MHJN020000171990

विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०
सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर
CNR-MHJNO20000171990

**निशाणी क्रमांक २९८ वरील आदेश**

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ (१) ते १ (४) तर्फे महत्वाचे कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

वादीच्या उलटतपासात पुराव्याकामी प्रतिवादींनी सदरच्या दाव्यात महत्वाचे कागदपत्र सादर केले आहे. सदर कागदपत्र दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदर कागदपत्र दाखल करण्याची परवानगी प्रतिवादींनी मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) वादीतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. मृत्यपत्र शाबीत केल्याशिवाय पुराव्यात वाचले जाऊ शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) प्रतिवादी क्र.१ (१) ते १ (४) व वादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) प्रतिवादींतर्फे प्रस्तुतच्या दाव्यात वादीचे उलटतपासकामी महत्वाचे

कागदपत्र जसे दिनांक ३०/०७/१९८३ रोजीचे मृत्यूपत्र सादर केले आहे. सदर मृत्यूपत्र दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे प्रतिवादींतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. परंतु, वादीतर्फे अर्जास विरोध दर्शविताना मृत्यूपत्र शाबीत केल्याशिवाय पुराव्यात वाचली जाऊ शकत नाही असे नमूद केले आहे. अर्जासोबतच्या वर्णन यादी निशाणी क्र.२९९ सोबतचे मुळ मृत्यूपत्र दिनांक ३०/०७/१९८३ रोजीचे असून सदर दस्त ३० वर्षापेक्षा जास्त जुना आहे. त्यामुळे वर्णन यादी निशाणी क्र.२९९ नुसार सादर केलेले दिनांक ३०/०७/१९८३ रोजीचे मुळ मृत्यूपत्र दाखल करण्याची परवानगी प्रतिवादी क्र.१ (१) ते १ (४) यांना देणे न्यायोचित होणार आहे. तसे झाल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याकरिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१ सदरचा अर्ज निशाणी क्र.२९८ खर्चाशिवाय मंजूर करण्यात येत आहे.

२ परिणामतः प्रतिवादी क्र.१ (१) ते १ (४) यांनी वर्णन यादी निशाणी क्र.२९९ सोबतचे दिनांक ३०/०७/१९८३ रोजीचे मुळ मृत्यूपत्र दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2022.09.14 13:50:00 +0530

(एन. एल. येवलेकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर
जालना

दिनांकः १४/०९/२०२२

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : १४/०९/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)